# प्रकरण 1

# प्रस्तावना

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

जगात भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ मानली जाते. विविधतेने नटलेल्या या देशात भारतीय प्राचीन परंपरा, संस्कृती आणि तत्त्वज्ञान या बाबींना प्रामुख्याने महत्त्वाचे मानले जाते. भारतीय तत्त्वज्ञानाची अभ्यासाच्या दृष्टिकोनातून प्राचीन व आधुनिक तत्त्वज्ञान अशी विभागणी केली जाते. या व्यतीरिक्त सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञान असेही भाग केले जातात. आखिल मानवजातीचा व सृष्टीचा अभ्यास तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून केला जातो. या अनुषंगाने तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांत त्यांची विभागणी केली जाते. राजकीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने राजकीय संकल्पनांचा तात्त्विक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. भारतीय तत्त्वज्ञानाची अशा स्वरूपाची विभागणी होत असली तरी केवळ सत्य शोधणे हेच उद्दिष्ट सर्वांचे होय. बौद्ध, जैन, सांख्य वेदांत यासारख्या प्राचीन तत्त्वज्ञानाने मानवतावादी दृष्टिकोनाचाच स्वीकार करून आत्मोन्नतीला महत्त्वाचे मानले आहे. यामुळे कोणत्याही प्रकारचा भेदभाव मान्य केलेला नाही.

प्राचीन काळापासूनच स्त्रियांना मानाचे व सन्मानाचे स्थान देण्यात आलेले आहे. यामुळे प्रत्येक काळात स्त्रियांनी स्वकर्त्तृत्वाने प्रत्येक क्षेत्रात यशस्वी कामगिरी केलेली आहे. याचे श्रेय उपनिषदकाळा पासून स्त्री शिक्षणाला देण्यात येणारे महत्त्व शिक्षणाला द्यावे लागेल. उपनिषदांच्या भाषेत जे आकाश तेजपुंज आणि अमृतमय आहे आणि जी विश्‍वचेतना आहे तेच श्रेष्ठ होय, तेच ब्रह्म होय. उपनिषदाप्रमाणे ब्रह्म तेच होय जे केवळ आकाशामध्ये नाही तर जो आपल्या मनामध्ये देखील तेजस्वी आणि अमृतशील पुरूष आहे. जो विश्‍वचेतनेचे स्त्रोत आहे तेच ब्रह्म होय. आपल्या आत्म्यामध्ये याच ब्रह्माची चेतना आहे. त्यामुळे या व्यापक प्रेरणेच्या प्राप्तीसाठी आपल्याला आपल्या आतील प्रेरणेने जगातील अपार प्रेरणेचा समभाव स्थापित करावयाचा आहे. प्रेरणाच व्यक्तिला क्षुद्रतेकडून विशालतेकडे घेवून जाते. प्रेरणेच्या आधारावरच व्यक्तिचा अंतरबाह्य विकास होत असतो. विश्‍वातील कोणतीही समस्या अध्यात्मिक व भावनाशिल माणसाला आपल्या मार्गावरून विचलित करू शकत नाही. मानवी

जीवनाचा उद्देशच हा आहे की, तो नेहमी अपूर्णत्त्वाकडून पूर्णत्त्वाकडे जाण्याचा प्रयत्न करत असतो आणि पूर्णत्त्व तेच होय की, जे मिळाल्यानंतर पुन्हा काही मिळविणे शिल्लकच राहत नाही. भारतीय तत्त्वज्ञानाने पूर्णत्त्व प्राप्त होण्याकरिता परमार्थाचा मार्ग स्वीकारलेला आहे. सद्यःस्थितीत भौतिक सुख हेच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट मानले जाते. याकरिता अनेक अपराध किंवा गुन्हे व्यक्तिच्या हातून होतात. व्यक्तिच्या जीवनाला अध्यात्माची जोड असेल तर समस्याच निर्माण होणार नाहीत. योग्य-अयोग्य, सत्य - असत्य यातील भेद जाणून निर्णय घेतले जातील. व्यक्तिने सत्य शोधत असताना पूर्वग्रह आणि पूर्व कल्पना यापासून दूर राहून सत्य शोधले तर सत्य शोधता येते. सत्य शोधताना समस्याच निर्माण होणार नाहीत.

मी माझ्या संशोधानाकरिता सामाजिकशास्त्रातील तत्त्वज्ञान या विषयांतर्गत, 'श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचारविश्वःएक तात्त्विक विश्लेषण' हा विषय त्यांच्या तात्त्विक दृष्टिकोनाच्या संदर्भाला अनुसरून निवडलेला आहे. प्रारंभी या विषयाच्या संदर्भात नकारात्मक दृष्टिकोन अनेक जणांनी व्यक्त केले. कारण एक राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणटल्यानंतर त्यात कोणता तात्त्विक दृष्टिकोन असेल? असा प्रश्न उद्भवला. असे असले तरीही प्रत्येक व्यक्तिचा विशिष्ट स्वरूपाचा तात्त्विक दृष्टिकोन असतो. व्यक्तिच्या त्यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला देखील त्याचे जीवनविषयक तत्त्वज्ञान म्हटले जाते. या अनुशंगाने श्रीमती इंदिरा गांधी या राजकीय व्यक्तिमत्त्वच्या असल्या तरी त्यांचाही जीवनाकडे पाहण्याचा किंवा समस्यांकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टिकोन असणारच. या अनुषंगाने हा विषय निवडण्यात कोणतीच समस्या येवू नये. त्यांचा तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन राजकीय तत्त्वज्ञानाअंतर्गत केलेला आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या विचारांवर भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला आहे. त्यांना भारतीय तत्त्वज्ञानाचा जीवनविषयक दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा वाटला. जीवनविषयक दृष्टिकोनाच्या संदर्भात स्पष्ट करताना, त्यांनी सांगितले की, व्यक्तिच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर त्यांचे तत्त्वज्ञान आधारित असते. माणूस गणितशास्त्रातला केवळ आकडा नसून त्याच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. या दृष्टिकोनातून जीवनाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे असे त्या मानीत.

सामाजिक परंपरेनुसार स्त्रियांकडे उपेक्षित वर्ग म्हणून पाहाण्यात येते. संधी, सत्ता, प्रतिष्ठा यांच्यामध्ये स्त्रियांना पुरूषापेक्षा कमी समजण्यात येते. त्यामुळे स्त्रियांना सतत मानसिक, शारीरिक गुलामीला तोंड द्यावे लागते. सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून स्त्रियांना सामाजिक, अर्थिक क्षेत्रात निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्री शिक्षणाचा परिणाम म्हणून स्त्रियांनी सर्वच क्षेत्रात यशस्वीपणे सहभाग नोंदविला. सुरूवातीच्या काळात स्त्रियांनी राजकारणात अप्रत्यक्षपणे कामगिरी केली असली तरी अल्पावधीतच स्त्रिया राजकारणात प्रत्यक्षपणे कार्य करू लागल्या राजकारणात सहभागी होवून त्यांनी आपल्या कर्तृत्त्वाची छाप सोडली आहे. अशा स्त्रियांमध्ये झाशीची राणी, रजीया सुलताना, आधुनिक काळात भारतीय राजकारणाचा विचार केला असता भारतीय राजकारणाला नवीन दिशा प्राप्त करून देणारे स्त्री राजकीय नेतृत्त्व म्हणून श्रीमती इंदिरा गांधी यांना विचारात घ्यावे लागेल. ज्यावेळेस रशियन राज्यक्रांती झाली होती त्यावेळेस, म्हणजेच 19 नोव्हेंबर 1917 ला इंदिरा गांधी यांचा जन्म झाला. श्रीमती इंदिरा गांधी यांनी बालवयापासूनच स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविला होता. त्याचे उदाहरण म्हणजे वानरसेनेची स्थापना व समरव्हिले महाविद्यालयात असताना लेबर पार्टीच्या आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला होता. 21 व्या वर्षी (1938 मध्ये) भारतीय काँग्रेसमध्ये सहभागी झाल्या. इंदिरा गांधी यांच्या विचारांवर म. गांधी, पंडित नेहरू, रविंद्रनाथ टागोर, कमला नेहरू याबरोबरच जॉन ऑफ अर्क या पुस्तकाचा प्रभाव अधिक झाला. याचा परिणाम असा झाला की, त्यांनी दरिद्रीनारायणाची सेवा हे जीवनाचे मुख्य ध्येय मानले. मानवतावादी तत्त्वाला महत्त्वाचे मानले. 1947 मध्ये पाकिस्तानातून येणाऱ्या शरणार्थीची सेवा त्यांनी निष्ठेने केली. हे त्यांच्या मानवतावादी दृष्टिकोनाचे सर्वात मोठे उदाहरण होय. ताश्कंद करारानंतर लाल बहादूर शास्त्रीचे निधन झाले आणि देशाने 19 जानेवारी 1966 ला इंदिरा गांधीना प्रधानमंत्रीपद दिले. त्यावेळी देशासमोर अनेक समस्या होत्या. त्यांनी देशासमोरील समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्न केले. श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशातील गरिबी हटविण्यासाठी 'गरिबी हटाव' चा नारा दिला. याबरोबरच त्यांनी अर्थिक विषमता दूर करण्यासाठी देशातील भांडवलदारांची पर्वा न करता देशातील मोठ्या 14 बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत झाले. या संदर्भात त्या म्हणतात, "राष्ट्र विकास

व्हावयाचा असेल तर देशातील गरिबी नाहीशी झाली पाहिजे." अर्थिक विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्न केले. राष्ट्रविकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे महागाई हा होय. या संदर्भात पुरूषोत्तम कपूर यांना दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्पष्ट केले की, "महँगाई को रोकने के लिये सरकारी निती तो आवश्यक है हि किंतू इसके साथ हि इस काम में जनता का सहयोग भी बहुत जरूरी है | इस दिशा में जनसहयोग को जागृत करने के लिये विभिन्न संस्थाओ को आगे आना चाहीये |"[1] सद्य परिस्थितीचा विचार केला असता राष्ट्रासमोरील सर्वात मोठी समस्या ही महागाई हीच आहे. ती कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

विरोधी पक्षांनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्याविरूद्ध कटकारस्थान रचून त्यांना कॉंग्रेसच्या प्राथमिक सभासदत्त्वापासून निलंबित करून संसदेचा नवीन नेता निवडण्याचा आदेश दिला. देशातील अनिश्चितता व पराजयाला पाहून डिसेंबर 1970 मध्ये संसद भंग करून देशात नवीन निवडणुका घेण्यासाठी राष्ट्रपतीकडे शिफारस केली. 1971 ला 'गरिबी हटाव' हा नारा देवून निवडणूक रिंगणात त्या उतरल्या व पक्षाला त्यांनी 2/3 बहुमत मिळवून दिले. त्यामुळे घटनेत बदल करण्याचा अधिकार प्राप्त झाला. 1971 मध्ये भारत - पाक युद्धानंतर स्वतंत्र बांगला देशाची निर्मिती करून त्यांनी पाकिस्तानला एकतर्फी युद्धबंदीस प्रवृत्त केले. त्यांच्या या निर्णयामुळे त्यांच्यातील मुत्सद्देगिरी व धाडसीवृत्तीचे दर्शन घडले. यामुळे जागतिक राजकारणातील स्थान व सिमला करारामुळे त्यांचा हा काळ गौरवाचा राहिला. दुर्गादेवी, रणचंडी यासारख्या पदव्या सर्वसामान्य जनतेने त्यांना दिल्या. भारत सरकारने 18 डिसेंबर 1979 मध्ये 'भारतरत्न' हा किताब देवून त्यांचा गौरव केला. याच काळात त्यांनी भारत-रशिया मैत्री करार करून देशाला बलवान मित्र मिळवून दिला. जागतिक स्तरावर त्यांनी अलिप्ततावादी तत्त्वाचा स्वीकार करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले राष्ट्रविकास साधत असताना अनेकवेळा त्यांना अपयशाला सामोरे जावे लागले, परंतु अपयशाने त्या खचून गेल्या नाहीत. 1975 मध्ये अलाहाबाद कोर्टाने 1971 च्या निवडणुकीचे सदस्यत्त्व अवैध ठरविले. अशा परिस्थितीत अनेक समस्यांना त्यांनी तोंड दिले. परिस्थितीला आटोक्यात आणण्यासाठी 25 जून 1975 ला राष्ट्रपतीच्या शिफारशीनुसार देशात आणीबाणी घोषित केली. आणीबाणीच्या काळात त्यांनी जनहितार्थ 20 कलमी कार्यक्रम राबविला. त्यामध्ये कुटुंब

नियोजनाचा समावेश होता. प्रशासकीय अधिकाऱ्यानी अतिरेक करून अशिक्षित व गरीब लोकांचे जबरदस्तीने कुंटुंब नियोजन करून घेतले. यामुळे जनता नाराज झाली. हुकूमशहाच्या रूपात त्यांना पाहू लागली. याचा परिणाम 6 व्या सार्वत्रिक निवडणुकीवर झाला. यात जनता पक्ष आघाडीवर आला व इंदिरा गांधी यांनी 22 मार्च 1977 ला राजीनामा दिला. सर्वसामान्य जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून सत्तेवर नसतानादेखील अनेक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. श्रीमती इंदिरा गांधी यांनी आणीबाणी व रूपयाचे केलेले अवमूल्यन यामुळे एका हुकूमशहाच्या रूपात जनता त्यांच्याकडे पाहू लागली. राष्ट्रविकासाच्या अनुषंगाने महत्त्वाचे निर्णय घेतले. समाजवादी दृष्टिकोनातून देशातील आर्थिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर राष्ट्रविकासाचे महत्त्वाचे साधन म्हणून शिक्षणाला महत्त्वाचे मानले. वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करून विकास साधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शिक्षण संकल्पनेत त्यांनी निरंतर शिक्षणाला महत्त्वाचे मानले. देशातील प्रत्येक घटकाला शिक्षण मिळाले पाहिजे या अनुषंगाने त्यांनी प्रयत्न केले. शिक्षण संकल्पनेत विद्यार्थी हा महत्त्वपूर्ण घटक असतो असे त्यांनी मानले. परिवर्तन करण्याची क्षमता त्यांच्यात असते. या संदर्भात दिल्ली येथे युवक काँग्रेसच्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, "सुधार के लिये छात्रो की अनुशासनहिनता समझकर तिरस्कृत करणे हे स्थान में उनकी शक्ती व बुद्धी का उचित उपयोग करना चाहीए | उनका कहना हैं की,किसी भी देश का वातावरण नवयुवक ही बदल सकते है| किंतू राजनितीक मामलो के संबंध में उन्होने छात्रो को सतर्क रहने की,सलाह दी थी|"[2]

राष्ट्रविकासात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते, असे त्यांनी मानले. या संदर्भात त्यांनी 13 जानेवारी 1970 मध्ये गोरखपूर विद्यापिठाच्या शिक्षक Association प्रसंगी बोलताना स्पष्ट केले की, "Education is extremely important but education is not just the acquiring of knowledge it is changing yourself into a sort of person who can adapt to changing conditions and who can play a significant role in changing society moddern society as you have rightly said not only in India but all over the

world is changing very fast indead and therefore, the frustration among the youth is universal and every where one aftur another, countries are finding that something is wrong with their education processes and student are revolting against those old processes".[3]

शिक्षणाबरोबरच राष्ट्रविकासाचे महत्त्वाचे साधन म्हणून लोकशाही तत्त्वाला त्यांनी महत्त्वपूर्ण मानले. राष्ट्राच्या दृष्टीने शासन पद्धती कोणतीही असो त्यापेक्षा देश श्रेष्ठ असे त्यांनी मानले. या संदर्भात 22 मार्च 1976 मध्ये 'लोकशाहीचे आव्हान' या परिसंवादात त्यांनी स्पष्ट केले, "लोकशाही श्रेष्ठ खरी; पण तिच्याहून देश मोठा आहे. एखाद्या पद्धतीची कसोटी ही की, ती राष्टाचे ऐक्य आणि एकात्मता यांना उपयोगी पडते की नाही. विविध भाषा, धर्म, रितीरिवाज असलेल्या आमच्या देशात लोकशाही पद्धतीच एकत्र ठेवील, अशी आमची खात्री आहे. कारण लोकशाहीत सर्व लोकांना सहभागी होता येते"[4] म्हणून त्यांनी लोकशाहीतील निधर्मीपणा व समाजवादी या तत्त्वाला महत्त्वाचे मानले.

28 जुलै 1979 ला चरणसिंहाच्या नेतृत्त्वाखाली लोकदल पक्षाचे सरकार बनले. विरोधी पक्ष म्हणून पहिल्यांदाच इंदिरा गांधी यांनी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला कर्तबगारीने व जनतेच्या विश्वासाने त्यांनी अनेक समस्यांना तोंड देत 6 जानेवारी 1980 ला सातव्या लोकसभेची निवडणूक पार पाडली व त्यांच्या पक्षाला त्यांनी बहुमत मिळवून दिले. 1983 मध्ये अलिप्ततावादी देशाचे 7 वे संमेलन दिल्ली येथे आयोजित करण्यात आले. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात भारत अण्वस्त्रधारक राष्ट्र बनले. तसेच राकेश शर्मा भारतातील प्रथम अंतराळवीर बनला. भारतीय महिला बचेंद्रीपालने एव्हरेस्ट शिखर चढून तेथे तिरंगा ध्वज फडकविला. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून जागतिक पर्यावरण परिषदेचे सदस्यत्त्व त्यांनी स्वीकारले व मेलबर्न येथील पर्यावरण परिषदेस उपस्थिती दिली. देशातील सर्वच प्रश्न केवळ राजकीय नेत्यांवर अवलंबून राहून सुटत नाहीत तर त्यासाठी जनतेच्या साह्याची आवश्यकता असते. असे राजकीय नेतृत्त्व स्वीकारलेल्या इंदिरा गांधी यांनी स्पष्ट केले. या संदर्भात वाराणसी येथे भरलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या 55 व्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना स्पष्ट केले, "आधुनिक जगाचे प्रश्न राजकीय नेत्यावर सोपवून चालणार नाही,

शास्त्रज्ञांनी व तंत्रज्ञानी केवळ सल्लागाराची भूमिका न घेता ते प्रश्न सोडविण्याच्या कामी पुढाकार घ्यावा".[5]

श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळाची विभागणी केली असता त्यांचा तिसरा कार्यकाळ अत्यंत बिकट राहिला. या कार्यकाळात त्यांनी आतंकवादी कार्यवाहीतून पंजाबला मुक्त करण्याकरिता 3 जून 1984 ला 'ब्ल्युस्टार ऑपरेशन' या नावाने सैनिकी कार्यवाही केली. सुवर्णमंदिरातील अकाल तक्ताला हानी पोहोचल्यामुळे देशातील शीख बांधव धार्मिक दृष्ट्या दुखावले होते. राष्ट्रविकासाच्या व हिताच्या दृष्टिकोनातून घेतलेला हा निर्णय त्यांच्या जिवाच्या दृष्टिकोनातून चूक ठरला. त्यांनी जिवाची कधीच पर्वा केली नाही. त्यांच्या खूनापूर्वी एक दिवस अगोदर ओरिसामधील देशबांधवांना उद्देशून केलेल्या आपल्या शेवटच्या भाषणात त्या म्हणाल्या होत्या,"जेव्हा माझं जीवन संपून जाईल तेव्हा माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब या देशाला जीवन देईल आणि देशाला सामर्थ्यवान बनवील". पंजाबची समस्या सोडविताना राष्ट्रहिताच्या अनुषंगाने त्यांनी घेतलेला ब्ल्युस्टार ऑपरेशनचा निर्णय त्यामागे होते. पण त्यांच्या या निर्णयामुळे त्यांना आपला जीव गमवावा लागला. 31 आक्टोबर हा दिवस त्यांच्या आयुष्यातील शेवटची सकाळ होती. देशाच्या अनेक समस्या व काळजी घेवून त्यांनी शेवटचा श्वास घेतला. त्यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी सूड भावनेतून हत्या केली.

श्रीमती इंदिरा गांधी यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या अत्यंत प्रभावी उद्गात्या असा लौकिक त्यांनी संपादन केला. देशाला मिळालेलं त्यांचं नेतृत्त्व 'युगकारक' आहे. अनेक महत्त्वाच्या घडामोडी त्यांच्या कारकिर्दीत घडून गेल्या. देशात समाजवाद आणण्यासाठी इंदिरा गांधी यांचे नेतृत्त्व महत्त्वाचे आहे, असे मत तत्कालीन परिस्थितीत मांडण्यात आले. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या संदर्भात देवकांत बरूआ यांनी स्पष्ट केले, "भारत म्हणजे इंदिरा आणि इंदिरा म्हणजे भारत"[6]

श्रीमती इंदिरा गांधी यांची राष्ट्रभक्ती व देशप्रेम अतूट स्वरूपाचे होते. राष्ट्रविकास राष्ट्रीय ऐक्य टिकविणे हे एकमेव उद्दिष्ट त्यांचे होते. त्यांनी आपल्या अंतिम इच्छा पत्रात (मृत्युपत्रात) लिहिले. "कोई भी नफरत इतना काला नही है जो अपनी क्षमता और अपने देश के प्रति मेरे प्यार के विस्तार को ढक सके, कोई ताकत इतनी ताकतवर नही है जो इस देश को

आगे बढाने के मेरे उद्देशयो और प्रयासो को विचलित कर सके (मै समझ नही सकती की कैसे कोई भारतीय होकर भी गौरवान्वीत नही होता है"|[7]

श्रीमती इंदिरा गांधी यांनी यशस्वी जीवनासाठी किंवा कोणत्याही क्षेत्रातील यशासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून चांगल्या विचारांना मानले या संदर्भात त्यांनी स्पष्ट केले की, "मै नहीं रही तो और बहुत लोग खडे हो जायेगे, सवाल. व्यक्तियो का नही अच्छे विचारों का है और उन्ही की रक्षा के लिये जो यह नया युद्ध छिडा है वह चलता हि रहेगा| और एक मानी हुई बात हमेशा से अच्छे विचार जीते है, और हमारी जीत की निश्चीत है|".[8]

श्रीमती इंदिरा गांधी यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आला. अमेरिकेने 1953 साली आपले "मातृपारितोषिक" देवून त्यांचा गौरव केला. त्याप्रमाणेच येल विद्यापीठाने ठेवलेले हाऊलँड मेमोरीयल प्राइज 1960 साली देण्यात आले. हे पारितोषिक वाङ्मय, कला व राजकारण यामधील कामगिरीबद्दल देण्यात येते.

श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचार, नेतृत्त्व व कर्तृत्त्व राष्ट्रभक्ती यामुळे त्या सर्वात लोकप्रिय नेत्या म्हणून ओळखल्या जातात. 2005 च्या स्वातंत्र्य दिवसाच्या प्रसंगी हिंदुस्थान टाइम्सने मतसंग्रह केला त्यात हे स्पष्ट झाले की, "भारत की महानतम नेता इंदिरा गांधी है|"[9] म. गांधी व पंडित नेहरू संयुक्त रूपाने दुसऱ्या क्रंमाकावर होते.

**गृहीतके :**

1. इंदिरा गांधी यांनी निरंतर शिक्षण संकल्पनेला महत्त्व दिले.
2. राष्ट्रविकास व राष्ट्रउन्नती हे एकमेव उद्दिष्ट इंदिरा गांधी यांच्या जीवनाचे होते.
3. इंदिरा गांधी यांनी आपल्या जीवनात अध्यात्माला महत्त्वाचे मानले.
4. इंदिरा गांधी यांनी स्वत:कडे एक स्त्री म्हणून न पाहता व्यक्ती या दृष्टीने पाहिले.
5. इंदिरा गांधी यांचे साहसीवृत्ती व कुशल नेतृत्त्व हे व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे पैलू होते.
6. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय स्तरावर मुत्सद्दीनेत्या म्हणून नावलौकिक मिळविलेल्या एकमेव नेत्या आहेत.

7. श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या एकमेव महिला पंतप्रधान होत्या.

8. इंदिरा गांधी यांचे राजकीय नेतृत्त्व सर्व महिलांसाठी प्रेरणादायी आहे.

9. इंदिरा गांधी यांनी आर्थिक क्षेत्रात समाजवादाचा पुरस्कार केला.

10. इंदिरा गांधी यांनी लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य या तत्त्वाचा पुरस्कार केला.

11. इंदिरा गांधी यांनी आंतरिक मूल्यांचा पुरस्कार केला.

**संशोधनाची समस्या (Research Problem)**

प्रस्तुत संशोधनाच्या अध्ययनाकरिता खालीलप्रमाणे संशोधन समस्यांची मांडणी केली आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या विचारांचा आढावा घेतल्यानंतर असे स्पष्ट होते की, इंदिरा गांधी यांच्या विचारात परिपूर्ण तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन आहे. यामुळे प्रत्येक क्षेत्रात केलेल्या यशस्वी कार्याबद्दल त्यांच्या विचारांची तात्त्विक दृष्टी पाहणे आवश्यक आहे.

1. इंदिरा गांधी यांच्या विचारांची सूत्रबद्ध मांडणी होणे आवश्यक आहे.

2. इंदिरा गांधी यांच्या तात्त्विक विचारांची मांडणी व्यवस्थित करणे गरजेचे आहे.

3. इंदिरा गांधी यांच्या सर्वच क्षेत्रातील यशस्वी कार्यामागील विचारांना तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन पहावयाचा आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत संशोधनाकरिता खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. भारतीय तत्त्वज्ञानात वेगवेगळ्या विचारसरणीचा समावेश होतो. त्यामध्ये राजकीय तत्त्वज्ञान ही एक विचारसरणी होय. इंदिरा गांधी यांची राजकीय कारकीर्द, राजकीय क्षेत्रातील यशस्वीता विचारात घेवून राजकीय तत्त्वज्ञ म्हणून त्यांना प्रस्तुत करणे.

2. इंदिरा गांधी यांच्या तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोनाचे सर्वच क्षेत्रातील क्रांतिकारक विचार पटवून देणे.

3. इंदिरा गांधी यांचे सर्वच क्षेत्रातील यशस्वी कामगिरीचे गमक करणे.

4. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांनी सर्वच क्षेत्रावर आपली पाडलेली छाप, हे कार्य करीत असताना स्वतंत्र निर्णय घेवून प्रत्यक्षपणे कार्य करण्याची क्षमता वाढविण्याच्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
5. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या विचारांचे तत्त्वचिंतन करून सर्व स्तरातील यशस्वी कार्य करण्यासाठी मार्गदर्शक विचारांच्या मांडणीचा अभ्यास करावयाचा आहे.
6. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या विचारांवर पडलेला प्रभाव आणि त्यांचे प्रत्यक्षपणे होणारे परिणाम हे स्पष्ट झालेले आहेत. सद्यःस्थितीमध्ये राजकीय, प्रशासकीय क्षेत्रात वाढलेली सं:दिग्ध स्थिती पाहता इंदिरा गांधी यांच्या विचारांचा उपयोग करून घ्यावयाचा आहे.
7. परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात असणारा अस्पष्टपणा, सामाजिक परीस्थितीचे परिवर्तन करून घेण्यासाठी इंदिरा गांधी यांच्या विचाराचा उपयोग होतो. तो करून घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.
8. श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपल्या विचारात तत्त्वज्ञान व विज्ञान यांची सांगड घालून योग्य निर्णय घेतले आहेत.

**संशोधनाची पद्धत (व्यष्टी अध्ययन पद्धतीचा उपयोग)**

प्रस्तुत संशोधनाकरिता आवश्यकतेनुसार प्राथमिक व द्वितीय साधनांचा उपयोग करून तात्त्विक, संश्लेषणात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

**संशोधन विषयाची व्याप्ती (Scope of the research topic)**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत घटकांचा समोवश करता येईल.

1. इंदिरा गांधी यांच्या लेख, ग्रंथ, भाषणे यामधून त्यांच्या वैचारिक पातळीचा आठावा घ्यावयाचा आहे.
2. इंदिरा गांधी यांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, मूल्यविषयक विचार स्पष्ट करणे.
3. इंदिरा गांधी यांच्या सर्वच क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांच्या विचारांचे सर्वांगाने चिंतन करावयाचे आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधनाकरिता प्राथमिक व द्वितीय साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे. इंदिरा गांधी यांनी केलेली भाषणे, त्यांचे लेखसंग्रह आणि ग्रंथ यांचे अध्ययन करावयाचे आहे. इंदिरा गांधी यांच्या विचारांवर विविध अभ्यासकांनी लिहिलेल्या ग्रंथाचे अध्ययन करून ग्रंथालयीन साहित्यानुसार शोधनिबंध, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात आले.

**प्रकरणांची रचना**

प्रस्तुत संशोधन कार्य पार पाडण्यासाठी हा शोधप्रबंध खालील सात प्रकरणांत विभाजित करण्यात आला असून या प्रत्येक प्रकरणांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

✓**प्रकरण पहिले :** हे प्रस्तावनेवर आधारित आहे. या प्रकरणामध्ये संशोधनाचे गृहीतकृत्ये, महत्त्व, आवश्यकता, संशोधनाचे उद्दिष्ट आणि संशोधनाच्या पद्धतीविषयी माहिती सांगण्यात आलेली आहे. त्याचबरोबर एकूण प्रकरणाची रचना विशद केली आहे.

✓**प्रकरण दुसरे :** हे श्रीमती इंदिरा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारे आहे. या प्रकरणात श्रीमती इंदिरा गांधी यांच्या बालसंस्काराबरोबरच त्यांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेत असताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव करणाऱ्या घटकांचा अभ्यास करण्यात आला असून त्यांची कौटुंबिक स्थिती त्यानुसार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा होणारा विकास या संदर्भात अभ्यास करण्यात आलेला आहे.

✓**प्रकरण तीन :** राजकीय तत्त्वज्ञान यामध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांच्या राजकीय विचारांचा आढावा घेत असताना त्यांची राजकीय क्षेत्रातील यशस्वी कामगिरी- त्याचबरोबर त्यांची मूल्यविषयक संकल्पना, लोकशाही संदर्भातील विचार, स्वातंत्र्य, समता-धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद, आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण. या सदंर्भातील विचार स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

✓**प्रकरण चार :** श्रीमती इंदिरा गांधी यांचे सामाजिक तत्त्वज्ञान प्रस्तुत प्रकरणामध्ये इंदिरा गांधी यांनी सामाजिक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात विचार स्पष्ट करताना महिलांच्या सशक्तीकरणासंदर्भात किंवा महिलांच्या संदर्भात स्पष्ट केलेले विचार व कार्य या संदर्भात त्यांची भूमिका, याचबरोबर

अस्पृश्यतेच्या संदर्भातील विचार, या व्यतिरिक्त हिंदू - मुस्लिम ऐक्याच्या संदर्भातील विचार यात स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

✓**प्रकरण पाच :** श्रीमती इंदिरा गांधी यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान प्रस्तुत प्रकरणात श्रीमती इंदिरा गांधी यांची शिक्षण संकल्पना स्पष्ट करताना त्यांचे माध्यमिक व उच्चशिक्षणाच्या संदर्भातील विचार स्पष्ट झाले आहेत. त्याचबरोबर शैक्षणिक क्षेत्रात असणारे आरक्षणाच्या संदर्भातील त्यांचे विचार या ठिकाणी स्पष्ट झालेले आहेत.

✓**प्रकरण सहा :** श्रीमती इंदिरा गांधी यांचे अर्थिक तत्त्वज्ञान - प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांनी आखलेल्या अर्थिक धोरणाचा अभ्यास करून त्यांचे बँक राष्ट्रीयीकरण, रूपयाचे केलेले अवमूल्यन यांच्या संदर्भातील विचारांबरोबरच त्यांच्या दहा कलमी अर्थिक कार्यक्रम, पंचसूत्री, अर्थिक कार्यक्रमाच्या संदर्भातील विचार स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

✓**प्रकरण सात :** निष्कर्ष - या ठिकाणी प्रस्तुत प्रबंधातील गृहीतकांच्या आधारे जी चर्चा केली आहे. त्यावरून निष्कर्ष मांडला आहे.

## संदर्भ


1. वर्मा ताराचंद, प्रियदर्शनी इंदिरा गांधी, (संपा) कृष्णविहारी सहल, चिन्मय प्रकाश जयपूर 1973, पृ. क्र. 15.
2. कित्ता पृ. क्र. 16
3. Grover Verinder, Indira Gandhi A Biography of Her Vision and Ideads, Deep and Deep Publication, New Delhi, Page No.110.
4. कोशे ग. श्री, स्वप्नसिद्धीची दहा वर्षे इंदिरा गांधी, सोमैया पब्लिकेशन मुंबई, पृ. क्र. 159.
5. मंगळवेढेकर राजा, भारतरत्न इंदिरा गांधी, इनामदार बंधू प्रकाशन पुणे, पृ. क्र. 23.
6. वाळिंबे वि.स., इंदिरा गांधी बंगलोर ते रायबरेली, अभिजित प्रकाशन पुणे, पृ.क्र. 213.
7. मल्होत्रा इंदर, इंदिरा गांधी, अनु ब्रजकुमार पाण्डेय, ग्रीन पार्क प्रकाशन, नई दिल्ली, आवृत्ती 2008, पृ. क्र. 187.
8. कौशिक शिवकुमार, प्रियदर्शिनी इंदिरा गांधी (अंपा) नवभारत टाईम्स दिल्ली, प्रथम संस्करण 1970, दिल्ली प्रकाशन, पृ. क्र. 232.
9. मल्होत्रा इंदर, इंदिरा गांधी, अनु ब्रजकुमार पाण्डेय, ग्रीन पार्क प्रकाशन, नई दिल्ली आवृत्ती 2008, पृ. क्र. 88.